पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद-431111.

# लहुजी साळवे बाल संस्कारकेंद्र

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष : 2021-2022

समिती प्रमुख
डॉ. मंजुषा नळगीरकर

प्राचार्य
डॉ. एस. आर. टकले

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
# लहुजी साळवे बालसंस्कार केंद्र
# वार्षिक अहवाल : 2021-2022

लहुजी साळवे बालसंस्कार केंद्र शैक्षणिक वर्ष 2021 - 2022 चा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**संस्कार केंद्र तासिका**

कोविड-19 महामारी च्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष 2021 -2022 मध्ये लहुजी साळवे बालसंस्कार केंद्रावर दरवर्षी महाविद्यालयातील प्राध्यापकां मार्फत घेतल्या जाणाऱ्या तासिकांचे नियोजन केवळ मार्च महिन्या पुरतेच करण्यात आले होते. मार्च महिन्यात प्राध्यापकांनी संस्कार केंद्रावर जाऊन तासिका घेतल्या.

**बाल आरोग्य तपासणी शिबिर**

लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र फुलंब्री येथे दिनांक 6 मे 2022 रोजी बाल आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील तपासणी शिबिरासाठी फुलंब्री प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ.सिकंदर शेख आणि डॉ. निती म्हस्के, सिस्टर मंगल नाईक या उपस्थित होत्या. शिबिरासाठी जमलेल्या अण्णाभाऊ साठे नगर वस्तीतील माता व बालकांना डॉ. सिकंदर शेख आणि डॉ. निती म्हस्के मॅडम यांनी उन्हाळयामध्ये बालकांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी लहान बालकांना सकाळी आणि सायंकाळी बाहेर खेळायला पाठवा असे सांगितले. दुपारच्या उन्हामध्ये मुलांना बाहेर पाठवू नका तसेच मुलांना पाणी जास्त प्रमाणात प्यायला सांगा. ताक, दही, लिंबू शरबत अशा पदार्थांचा त्यांच्या आहारामध्ये समावेश ठेवा. ऊन लागलं तर लगेच डॉक्टरांना दाखवा अशी माहिती दिली. सदरील शिबिरामध्ये 33 बालकांची तपासणी करण्यात आली. बालकांमध्ये सर्दी खोकला, त्वचाविकार, पोटदुखी आणि डोळ्यांची जळजळ इत्यादी आजार दिसून आले. डॉक्टरांनी काही विटामिनच्या गोळ्या तसेच ओ आर एस चे पॅकेट दिले तर काही औषधी लिहून दिल्या.

शिबिराच्या उद्घाटनासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.पांडुरंग कल्याण हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.त्यांनी देखील आपल्या अध्यक्ष समारोपात बालकांच्या आहार व आरोग्याविषयी माता-भगिनी शी संवाद साधला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राध्यापक बाबासाहेब लहाने तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
## लहुजी साळवे बालसंस्कार केंद्र
## कार्यक्रमाची छायाचित्रे : 2021-2022



बालसंस्कार केंद्रातील तासिका घेताना प्रा.विजय पांडे



बाल आरोग्य तपासणी शिबिरात मार्गदर्शन करताना डॉक्टर सिकंदर शेख



बाल आरोग्य तपासणी शिबिरात मार्गदर्शन करताना डॉक्टर निती म्हस्के



बालकांची तपासणी करताना डॉक्टर सिकंदर शेख





बालकांची तपासणी करताना डॉक्टर निती म्हस्के